Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# मराठी कथासाहित्यातील वैदर्भीय लेखिकांची वाटचाल व योगदान

**प्रा. उन्नती संजय चौधरी,** खिरोदा, ता. रावेर, जि. जळगाव

**प्रास्ताविक**

कथा हा समृद्ध व लवचिक असा वाङ्.मयप्रकार असून कादंबरीपेक्षा त्याचा अवकाश कमी असतो. त्यामुळे विदर्भातील लेखिकांनी कादंबरीपेक्षा कथा ह्या वाङ्.मय प्रकारात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला आहे. अरूणा पवार चवरे यांनी ‘वैदर्भीय स्त्रीकथा’ अशा दोन भागात प्रातिनिधिक कथासंग्रहाचे संपादन करून प्रसिद्ध केले आहे. दुसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेत त्यांनी लिहिले आहे की, “वऱ्हाडी भाषेतील मोलमजुरी करणारी स्त्रीदेखील स्वाभिमानाने जगत असते. ह्यावर प्रकाश टाकणारी ‘डॉ. प्रतिमा इंगोले’ यांची वऱ्हाडी भाषेतच संयुक्त कुटुंबव्यवस्थेतील ‘सासुबाई गुनाची लई’ एका कणखर स्त्रीची कथा आहे. ‘रत्ना बऱ्हाणपुरे’ यांची कथा लक्षवेधी आहे.तसेच स्त्रीलाही भावभावना असतात. तिच्याकडे माणूस म्हणून पहायला हवे. ह्यावर प्रकाश टाकणाऱ्या ‘पुष्पा काणे’ यांची ‘बहुतांच्या कार्यास यावे’, ‘डॉ. सुनिता काळे’ यांची ‘स्वाहा’, ‘उषकिरण आत्राम’ यांची ‘सखी’, ‘लक्ष्मीकमल गेडाम’ यांची ‘कलंकभोग’, ‘अमिता गहलोद’ यांची ‘असोसी’ या सर्व कथा. तर जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा सुरेल मिलाप सांगणारी डॉ. दमयंती पांढरीपांडे यांची ‘हेमलॉकचा पेला’ व्यावसायिक वातावरणातही संस्कार जपणारी ‘हेमलता जोहरापुरकरांची’ ‘पाथेय’. सणउत्सव कुठल्याही संस्कृतीचे असोत. त्यातील विचार एक असू शकतो, हे सांगणारी ‘हेमा नागपुरकरांची’ ‘व्हॅलेंटाईन’. एकीकडे मैत्रीचे स्थान दर्शविणारी ‘मृदगंध’ ही ‘अरूणा पवार-चवरे’ यांची भावनात्मक ओलावा देणारी कथा तर दुसरीकडे स्वार्थाने बरबटलेली माणसे कुठल्या स्तरावर जाऊन जगत असतात, हे सांगणारी ‘ज्योती मोहन पुजारी’ यांची ‘माणसाचा मुडदा,’ कौटुंबिक जिव्हाळयाची व्यथा बोलकी करणारी ‘विजया ब्राह्मणकर’ यांची ‘आई अगं हस न्’, मायभूमीचं अलौकिक प्रेम दर्शविणारी, भारतीय संस्कृती उराशी कवटाळून जगणारी ‘कलावती’. देशप्रेम देशप्रेमच आहे हे सांगणारी सौ. प्रतिभा कुलकर्णी यांची ‘मायग्रेषन’, एका समर्थ व्यक्तित्वाचा समर्थपणे आढावा घेणारी डॉ. ‘श्रद्धा पराते’ यांची ‘पोट्रेट’ अशा विविध विषय समावेशक खंड-२ मधील एकापेक्षा एक सरस कथा रसिकांना निश्चितच आवडतील.”[१]

अर्थातच विदर्भातील लेखिकांना त्यांच्या सशक्त लेखनीने कथावाङ्.मय समृद्ध केले आहे; म्हणून ‘वैदर्भीय स्त्रीकथा’ खंड १ च्या यशस्वी वाटचालीनंतर अरूणा पवार यांनी ‘वैदर्भीय स्त्रीकथा’ खंड २ चे संपादन केले. त्याहीवेळी त्यांना वैदर्भीय लेखिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. त्यांनी कथांच्या विषयाचे कुठलेच बंधन न ठेवल्याने विविध विषयांवरी कथांची ओळख वाचकांना त्यातून होते. अशा काही कथा लेखिकांची आणि त्यांच्या कथांची ओळख याठिकाणी करून देता येईल.

**कुमुद मंडलेकर**

यांनीही कादंबरीबरोबर कथालेखन केले आहे, कादंबरीपेक्षा त्यांच्या कथा अधिक लक्षवेधी ठरलेल्या आहेत. त्यांचे जवळपास पाच कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहे. स्त्रीजीवनात निर्माण होणारे संघर्ष त्यांनी टिपलेले आहेत. जसे – “कुमुद मंडलेकर यांच्या अनेक कथांतून स्त्रीची विविध रूपे साकार झालेली आहेत. त्यांच्या कथांतील स्त्रिया ह्या सांसारिक जीवनातील प्रश्नांनी आणि कुटुंबातील माणसाच्या वागण्याने त्रस्त आहे. अपार कष्ट व छळ सहन करूनही त्यांच्या वाट्याला दुःख आले असता, त्या खचून जात नाहीत, तर


Copyright © | JET Network, All Rights Reserved

परिस्थितीतून मार्ग काढतात. त्यासाठी स्वतःमध्ये आत्मबळ निर्माण करतात, तर कधी सासरच्या कुटुंबाला सोडून माहेरचा रस्ता धरतात."२ पितृसत्ताक कुटुंब पद्धतीत स्त्रियांना मिळणारी वागणूक चांगली नाही. त्यांना नवऱ्यामुळे होणारा त्रास आणि त्यांच्या सांसारिक जीवनाची वाताहत यावर लेखिकेने प्रकाश टाकलेला आहे. स्त्रीचे परावलंबन हे तिच्या दुःखाचे कारण त्यातून समजते. त्यासाठी लेखिका त्यांच्या कथांमधील नायिकांना स्त्रियांच्या स्वावलंबनविषयी आशय प्रकट करतात. मंडलेकर यांनी स्त्रीवादी भूमिकेतून कथालेखन केल्याने त्यांच्या कथांमधून स्त्रीजीवन ही कौटुंबिक सामाजिक जीवनात बंदिस्त असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

**प्रतिमा इंगोले**

यांनी खूप मोठ्या प्रमाणात कथालेखन केलेले आहे. विदर्भातील ग्रामीण जीवनाचे, लोकसंस्कृतीचे दर्शन त्यांनी खास वऱ्हाडी भाषेतून घडविले आहे. संपूर्ण कथा बोलीभाषेतून सांगणे हे त्यांच्या काही कथांचे वैशिष्ट्ये आहे. सुलभा हेर्लेकर यांनी लिहिले आहे की, "प्रतिमा इंगोलेच्या पुष्कळशा कथा या स्त्रियांवरील कथा आहेत. स्त्री ही दोन प्रकारची आहे. पहिली स्त्री ही देशमुख पाटलाच्या वाड्यातील सून, तिच्या भावभावना, तिचे नवोढत्व तर दुसरी स्त्री म्हणजे शोषित, अन्यायाला, अत्याचाराला बळी ठरलेली. या कथांचे बलस्थान म्हणजे लेखिकेची सूक्ष्म निरीक्षणशक्ती! जीवनात जेव्हा काही भावतरल, भावमग्न अनुभव येतात, त्याला कितीतरी पैलू असतात. एक स्त्री जेव्हा स्वतःचे भावविश्व कथेतून मांडते, तेव्हा त्याला एका वास्तवाचे परिमाण लाभलेले असते. एखाद्या पुरूषाने स्त्रीचे भावविश्व लिहिणे वेगळे आणि स्त्रीनेच स्त्रीच्या भावनांचा आविष्कार करणे वेगळे असते. एक भावजीवन जेव्हा कलावंत आपल्या कलेतून प्रामाणिकपणे ओततो, तेव्हा त्या कलेची उंची खूप मोठी असते. इंगोलेंच्या कथांतून ह्याची प्रचिती येते."३

वैदर्भीय खेड्यातील लोकमानस, लोकश्रद्धा, समजुती, दारिद्रय, रूढी, परंपरा आणि लोकोक्ती असे काहीसे ग्रामीण, प्रादेशिक चित्र हेतुपूर्वक इंगोले यांनी रेखाटले आहे. वऱ्हाडी माणसांच्या स्वभावाचे विविध दर्शन त्यांनी घडविले आहे. ग्रामीण साहित्य चळवळीची प्रेरणा घेऊन त्यांनी वऱ्हाडी भाषेतून वऱ्हाडी समाजजीवनावर प्रकाश टाकलेला आहे. उद्धव शेळके, मनोहर तल्हार, भाऊ मांडवकर यांच्या नंतर त्यांनी ग्रामीण जीवनाला कथाबद्ध केले. त्यांची कथानिर्मिती सर्वात जास्त असून बऱ्याच कथा गुणात्मक दृष्टीनेही महत्त्वपूर्ण ठरलेल्या आहेत.

**माधुरी आशिरगडे**

यांनी 'आई शप्पथ' या संग्रहात स्त्रीजीवनातील संघर्षाची विविध रूपे साकार केलेली आहेत. कौटुंबिक नातेसंबंध व विवाह संस्था, रूढी, परंपरा यावर प्रकाश टाकलेला आहे. त्यांच्या कथांची वैशिष्ट सुरेश द्वादशीवार यांनी सांगितले आहे की, "तिच्या कथा सहज साध्या आणि तरीही धक्का देणाऱ्या. चित्रपट तर जाणत्यांनाही अंतर्मुख करणारे आहेत. अशा लेखिकेच्या या कथा. या रूळलेल्या वाटेवरच्या नाहीत. नव्या पायवाटेवरच्या आहेत. त्यांच्या वेगळेपणाचे स्वागत होईल ही सदिच्छा!"४ कौंटुबिक व सामाजिक जीवन पुरूषसत्ताक पद्धतीने नियंत्रत झाले आहे. त्यामुळे स्त्रीच्या वाट्याला येणारे संघर्ष कमी झालेले नाही, असे त्यांच्या कथांमधून दिसून येते. स्त्रियांच्या जगण्यातील निर्माण होणाऱ्या प्रश्नाची मांडणी त्यांनी केलेली आहे. त्या प्रश्नांचे भांडवल न करता कथेला कलात्मक घाट प्राप्त करून दिला आहे. तटस्थपणे त्यांनी स्त्रीचे जीवनविश्व साकार केलेले आहे.

**सुमती वानखेडे**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

यांनी पतीपत्नीच्या नात्यातील नीरगाठ करून नंतर त्याची उकल करून दाखविली आहे. स्त्री दुबळी असते, तितकीच ती बंडखोरही बनू शकते. अशी स्त्रीरूपे त्यांनी कथेतून रेखांकित केलेली आहेत. अक्षयकुमार काळे यांनी त्याबाबत अभिप्राय दिला आहे की, "नागर स्त्री-पुरूषांच्या आधुनिक संवेदनशीलतेच्या दर्शनाबरोबरच मानवी भावसंबंधांच्या अनेकपदरी गोफाचे वैविध्यपूर्ण दर्शन या कथांमधून घडते. पुरूषप्रधान संस्कृतीला अस्फुट नकार देणारी स्त्रीची वेगळी प्रतिमा साकार करण्याचा त्यांचा प्रयत्न असला तरी वास्तवाचे त्यांना वाजवी भान आहे. अशा स्त्रीचा दुबळेपणा, असहाय्यता, अपराधभावना, शरण्यता, बंडखोरी या कथांतून साकार होते."[५] स्त्री स्वतःचे अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी प्रसंगी विद्रोही भूमिका घेते, याची जाणीव वानखेडे यांच्या कथेतून होते. मात्र त्यांच्या कथेतील स्त्रीही समाजभान राखून स्वत्व जपताना दिसते. उगीच आक्रस्ताळेपणा त्यांच्या नायिकांच्या ठिकाणी लेखिका आणत नाहीत. त्यामुळे त्यांची कथा स्त्रीच्या संयमशील व संवेदनशील मनाचे दर्शनही घडविते.

**सीमा साखरे**

यांच्या कथांतून स्त्रीवादी जाणिवांचा आविष्कार त्यांनी केलेला आहे. स्त्रीमधील स्त्रीपणाचा, तिच्या स्वतंत्र अस्तित्वाचा शोध घेताना साखरे यांनी स्त्री-पुरूष संबंधी विविध अनुभव कथांमधून मांडलेले आहेत. त्या स्वतः स्त्रियांना न्याय मिळवून देणाऱ्या स्त्रीवादी चळवळीतील कार्यकर्त्या असल्याने स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या समस्या व प्रश्न याविषयीचे प्रत्यक्ष अनुभव त्यांनी कथांतून प्रकट केलेले आहेत. त्यामुळे कथेची कारागिरी न करता त्यांनी साधेसरळ कथानिवेदन केले आहे. त्यातून स्रीचे भावजीवन विविध पातळीवर रेखांकित केलेले आहे.

'चार भिंतीच्या आड' हा त्यांचा कथासंग्रह त्यातून तयार झालेला असून त्यामागची भूमिका त्यांनी सांगितली आहे की, "यात बहुतांशाने स्त्रियांचा त्यांच्या न्यायासाठी एक अदृश्य आकांत आहे. त्या स्त्रिया नेहमीच्या नाहीत. पण स्वतःचे जीवनानुभव प्रामाणिकपणे कथन करणाऱ्या आहेत. या बहुतेक सर्व कथा कौटुंबिक आहेत. काही स्त्री-केंद्रीत आहेत. त्यांच्या भिन्न-भिन्न वाटचालीतील प्रसंगाची साक्ष देणाऱ्या आहेत. त्यातल्या अनेक नायिका दुःखद अनुभव घेऊन समोर आलेल्या आहेत, पण त्या पराभूत नाहीत. त्यांना जमेल तसे बरे-वाईट मार्ग त्यांनी शोधले आहेत. माझं या नायिकांवर प्रेम आहे. यातील काही कथांमधील पुरूषांचेही मला जवळून निरीक्षण करता आले. खरे तर या संपूर्ण कथासंग्रहात कौटुंबिक संघर्ष, 'स्व' साठी चाललेला संघर्ष आणि त्यातून हाताशी येणारं समाधान किंवा त्यांच्या व्यथा यांची अभिव्यक्ती आहे."[६] कुटुंबव्यवस्था ही स्त्री आणि पुरूष दोघांच्याही हिताची आहे, परंतु स्त्रीला त्यात मोकळा श्वास घेता येत नाही, तर दुःखभोग सहन करीत जगताना संघर्ष करावा लागतो. एक ना अनेक करणांनी स्त्रियांवर अत्याचार होतो,याबाबतचा आशय त्यांच्या स्त्रीकेंद्रीत कथांमधून प्रकट झालेला जाणवतो.

**मोहना कारखानीस**

यांनी विनोदी व गंभीर अशा दोन्ही प्रकारच्या कथांचे लेखन केले आहे. समाजातील वाईट परिस्थितीचे दर्शनही त्यांनी घडविले आहे. माधवी कुटे यांनी त्यांच्या कथांबाबत म्हटले आहे की, "नातेसंबंध, समाजात घडणाऱ्या अनिष्ट गोष्टी, परिस्थितीमुळे माणसाची होत जाणारी घडण, त्याची मानसिक आंदोलने, हातून घडलेल्या चुकांमुळे उदभवलेली दुःख, अशा अनेक ताण्याबाण्यांमधून लेखिकेच्या कथा घडत जातात. त्या लहानशा अवकाशात सारं काही मांडत जीवनदर्शन घडविण्याची कसोटी लेखिकेजवळ आहे. तशीच उत्तम व्यक्तिचित्रण, स्थळचित्रण करण्याची हातोटी असल्याने कथा चित्रदर्शी होत जातात."[७]


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

अशाप्रकारे विदर्भातील लेखिकांनी विविध विषयाच्या कथांचे लेखन केलेले आहे. अरूणा सबाने, सुप्रिया अय्यर, सुनीता कावळे, आशा बगे, स्नेहलता शेकापुरे या लेखिकांनी वैदर्भीय कथासाहित्यात विलक्षण भर घातलेली आहे. अरूणा पवार यांनी संपादित केलेल्या 'वैदर्भीय स्त्रीकथा' या दोन खंडातील कथा लेखिकांची संख्या पाहिली तर विदर्भातील कथालेखिकांचा सहभाग अधिक आहे, याची प्रचिती येते. या सर्वच लेखिकांच्या कथांचा चिकित्सक अभ्यास करणे हे संशोधनासाठी मर्यादा असल्याने सर्वच लेखिकांना एका वेळी प्रबंधात सामावून घेणे शक्य नाही, म्हणून पुढील प्रकरणांमधून विदर्भातील काही निवडक लेखिकांच्या कथांमधून स्त्रीपुरूष प्रतिमांचा विविधांगाने शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**निष्कर्ष**

१. टिळकनगर महिला मंडळा, जिजामाता वाचनालय, पद्मगंधा प्रतिष्ठान, नावीन्य कला अकादमी, रामनगर महिला मंडळा अशा किती तरी,साहित्य मंडळानी विदर्भ लेखिकांच्या साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन दिले आहे.
२. साहित्याच्या सर्वच प्रकारात विदर्भातील लेखिकानी त्यांच्या नावाचा ठसा उमटवीला आहे.
३. कथेच्या क्षेत्रात विदर्भातील लेखिकानी खूप मोठी कामगिरी केली आहेत्यांनी . स्त्रीजीवनाचे अनुभव मांडताना पुरुषसत्ताक व्यवस्था अधोरेखित केली असून पुरुषांच्या भावसंबंधाचेही चित्रण केले आहे.
४. प्रस्तुत लेखिकांनी त्यांच्या कथांमधून स्त्रीविषयक जाणिवा अधिक प्रकट करताना नातेसंबंधातील ताणतनाव अधोरेखित केले आहे .
५. पुरुषी अहंकारामुळे स्त्रीच्या वाट्याला येणारे दुखाचे अनेक पैलू या लेखिकांनी त्यांच्या कथांमधून वस्तुनिष्ठपणे उलगडून दाखविले आहे .

**संदर्भ सूची**

१. पवार-चवरे अरूणा, संपादन. वैदर्भीय स्त्रीकथा, संदेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, २०१०, प्रस्तावना, पृ. १०
२. डॉ. सुरवाडे मनोहर, मराठी ग्रामीण कथा : लेखिकांचे योगदान, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, २०१३, पृ. २०७
३. डॉ. हेर्लेकर सुलभा, आगळे अनुभवविश्व, दिलीपराज प्रकाशन प्रा.लि. पुणे, प्रथमावृत्ती, २००६, पृ. १९
४. द्वादशीवार सुरेश, आईशप्पथ, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, २०१३, पृ ब्लर्ब
५. डॉ. काळे अक्षयकुमार, जाणता : अजाणता..., उन्मेष प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००५, पृ. ब्लर्ब
६. साखरे सिमा, चार भिंतीच्या आत, सीमा प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, २००७, पृ. ९
७. कुटे माधवी, प्रस्तावना, पैंजण, डिंपल पब्लिकेशन, वसई रोड स्टेशन, पहिली आवृत्ती, २०१७, पृ. ९

 Copyright © | JET Network, All Rights Reserved